# 'भगवान बुध्द आणि कार्ल मार्क्स यांचे तत्वज्ञान - एक आंबेडकरी दृष्टिक्षेप'

**प्रा.डोंगरे एल.बी**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, हु.ज.पा.महाविद्यालय, हिमायतनगर जि.नांदेड

**प्रस्तावना :-**

मानवी जीवनाच्या उत्कर्षासाठी विचारधन निर्माण करणाऱ्या विचारवंतांपैकी भगवान बुध्द आणि कार्ल मार्क्स हे प्रमुख विचारवंत आहेत. कार्ल मार्क्स आणि भगवान बुध्दाचे तत्वज्ञान मानव जातीच्या कल्याणासाठी असले तरी दोघांचा या देहाप्रत पोहचण्याचा मार्ग आणि पध्दती भिन्न स्वरुपाच्या आहेत. भगवान बुध्दाचा मार्ग लांबपल्याचा नैतिक, अहिंसात्मक, लोकशाहीवादी, दीर्घकालिक आहे तर कार्ल मार्क्सचा विचार मध्यमपल्याचा आणि अंशकालीन, हिंसात्मक आहे. भगवान बुध्द आपल्या तत्वज्ञानातून स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय प्रस्थापित करून मानवी कल्याणाचा मार्ग सांगतात तर कार्ल मार्क्स आपल्या साम्यवादाच्या माध्यमातून समता, न्याय निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी काठमांडू येथे भरलेल्या जागतिक बौध्द परिषदेच्या समाप्तीपुर्वी राजे महेंद्र यांच्या अध्यक्षतेखाली २० नोव्हेंबर १९५६ ला डॉ.आंबेडकर यांनी भगवान बुध्द आणि कार्ल मार्क्स या विषयावर या महामानवाने, प्रज्ञावंताने आपल्या आयुष्यातील अखेरचे वैचारिक विश्लेषण आपल्या या भाषणात केले आहे. या भाषणात डॉ.आंबेडकरांनी मार्क्सवादापेक्षा भगवान बुध्दाचे तत्वज्ञान कसे श्रेष्ठ आहे याचे प्रतिपादन करून बौध्द धम्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिग्दर्शित केला आहे.

काठमांडूच्या बौध्द धम्म परिषदेत बौध्द धर्मातील अहिंसा हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाचा नियोजित विषय होता. बौध्द धम्म परिषदेतील उपस्थित बहुसंख्यांक लोकांच्या इच्छेमुळे भगवान बुध्द आणि कार्ल मार्क्स हा विषय ऐनवेळी डॉ.आंबेडकरांना भाषणासाठी देण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनात केळुसकर गुरूजींनी दिलेल्या भगवान बुध्दाच्या ग्रंथाच्या माध्यमातून भगवान बुध्दांच्या विचारांचे दर्शन विद्यार्थी दशेतच झाले. त्यामुळे डॉ.आंबेडकर भगवान बुध्दाच्या विचाराकडे आकर्षित झाले. प्रस्थापित हिंदू धर्मांचा त्याग करून १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी लाखो

अनुयायांसह त्यांनी नागपूर या ठिकाणी बौध्द धर्माची दिक्षा घेतली आणि भगवान बुध्दाला आपले गुरू मानले. त्याचबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राज्यशास्त्राचे आणि अर्थशास्त्राचे विद्यार्थी, प्राध्यापक, अभ्यासक असल्यामुळे त्यांचा मार्क्सवादाशी अगदी जवळचा संबंध आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मार्क्सवादाचे उत्तम प्रकारचे जाणकार होते; परंतु मार्क्सवादातील हिंसा आणि हुकूमशाही या तत्वामुळे त्यांनी मार्क्सवादाचे समर्थन केले नाही.

काठमांडूच्या जागतिक धम्म परिषदेच्या भाषणात बुध्द आणि कार्ल मार्क्स याविषयी आपले मनोगत व्यक्त करतांना डॉ.आंबेडकर म्हणतात जीवनातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी साम्यवादी जीवन मार्गापेक्षा बौध्द जीवनमार्ग मानवी जीवनाचे ध्येय साध्य करण्यासाठी चिरंतन ठरू शकेल. मार्क्सवादी विचार हा अल्पकालीन, रानावनातून भटकवणारा, अराजकतेकडे घेऊन जाणारा आहे तर, बुध्दाचा विचार हा मंद गतीचा, लांबपल्याचा तथापि खात्रीचा असून सुरक्षित व भक्कम पायावर उभा आहे. म्हणून कार्ल मार्क्सच्या मध्यम पल्याच्या मार्गापेक्षा भगवान बुध्दांचा लांबपल्याचा मार्ग मानवी जीवनाच्या ध्येयाप्रत पोहचवणारा आहे. म्हणून बुध्दाचा मार्ग हा मानवी जीवनाच्या कल्याणासाठी उपयुक्त आहे. कार्ल मार्क्सचा मध्यमपल्याचा मार्ग घातकी नसून महाघातकी ठरू शकतो.

**भगवान बुध्दाचे तत्वज्ञान आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारातील साम्य-भेद डॉ.आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून :-**

भगवान बुध्द आणि कार्ल मार्क्स या विषयावर काठमांडू येथे भरलेल्या जागतिक बौध्द धम्म परिषदेत भाषण देतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द तत्वज्ञान आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारातील साम्य-भेद पुढील प्रमाणे सांगीतले आहे.

**१) बुध्दाच्या तत्वज्ञानाचा आधार दु:ख तर मार्क्सवादाचा आधार शोषण :-**

तथागत भगवान बुध्दाने २५०० वर्षापूर्वी जगात दु:ख आहे. शोषणातून हे दु:ख, दैन्य, दारिद्र्य निर्माण होते. म्हणून बुध्दाने
दु:ख ही कल्पना घेऊन आपल्या तत्वज्ञानाची मांडणी केली. बौध्द वाङ:मयातील प्राप्त माहितीनुसार भगवान बुध्दाने शोषणाला पर्यायी शब्द दु:ख, दरिद्री, गरिबी या अर्थाने वापरला आहे. तर कार्ल मार्क्सने मानवी इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे असे प्रतिपादन करून आहे रे वर्ग नाही रे वर्गाचे शोषण करीत आहे. भांडवलदार वर्गाला

संपत्तीचा अधिकचा मोह असल्यामुळे ते कामगारांना गुलाम बनवत आहेत. त्यातून त्यांच्या वाटयाला शोषण आले आहे. म्हणून बौध्द तत्वज्ञानाचा पाया आणि मार्क्सवादाचा पाया यात मूलभूत फरक आढळत नाही. म्हणूनकोणत्याही बौध्द बांधवाला कार्ल मार्क्सचे दार ठोठावण्याची गरज नाही. कारण मार्क्सच्याही २५०० वर्ष अगोदर भगवान बुध्दाने हे विचारधन मांडून त्यावर उपाययोजनाही सांगीतल्या आहेत. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते बुध्दाच्या आणि कार्ल मार्क्सच्या विचारात कमालीचे साम्य दिसून येते.

**२) भगवान बुध्दाने आणि कार्ल मार्क्सने खाजगी मालमत्तेला विरोध केला आहे**

तथागत भगवान बुध्दाने बौध्द धम्माचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या बौध्द भिक्खु संघास खाजगी मालमत्ता बाळगण्यास विरोध केला आहे. भगवान बुध्दाने भिक्खु संघासाठी कडक अशी नियमावली सांगीतली आहे. त्यात भिक्खु संघाला खाजगी मालमत्ता बाळगता येणार नाही. बौध्द भिक्खुच्या खाजगी मालमत्तेच्या संदर्भातील आचारसंहिता आपणास विनयपिठकात दिसून येते. भगवान बुध्दाच्या या निर्बंधासमोर साम्यवादी निर्बंध फिके ठरतात. खाजगी मालमत्ता हे नैसर्गिक स्वातंत्र्य आहे त्याशिवाय व्यक्ती जगू शकत नाही. हे गृहित धरून आवश्यक गरजा भागविण्यासाठी लागणारी मालमत्ता बाळगण्यास बुध्दाने मान्य केले. हे स्वातंत्र्य मार्क्सच्या विचारात दिसून येत नाही. मार्क्स आपल्या मार्क्सवादात म्हणतो भांडवलदार आपल्या भांडवलाच्या जोरावर अधिकाधिक श्रीमंत होतो आणि राज्यातील सर्व उत्पादनाची साधने स्वतःकडे केंद्रित करतो. म्हणून राज्यातील उत्पादनाच्या साधनांवर भांडवलदाराची व्यक्तिगत मालकी असू नये तर त्यावर राज्याची किंवा सामुहिक मालकी असावी असे मार्क्स म्हणतो. म्हणुन मार्क्स आपल्या साम्यवादात भांडवलदाराच्या खाजगी मालमत्तेला विरोध करुन राज्याच्या किंवा सामूहिक मालकीचे समर्थन करतो. म्हणून खाजगी मालकीच्या संदर्भात भगवन बुध्द आणि कार्ल मार्क्स या दोघांच्या विचारात साम्य दिसून येते. खाजगी मालमत्तेच्या संदर्भात बुध्दाचे नियम कठोर व काही अंशी स्वातंत्र्य प्रदान करणारे आहे तर, मार्क्सचे खाजगी मालमत्ते संदर्भात नियम काही अंशी सैल व स्वातंत्र्य नाकारणारे आहे.

**३) भगवान बुध्दाने अहिंसेचा तर मार्क्सने हिंसेच्या मार्गाचा स्वीकार केला. :-**

भगवान बुध्दाने आपले तत्वज्ञान जनमाणसात रुजविण्यासाठी लोकांची मने वळविणे हा बुध्दाचा सनदशिर मार्ग होता. नैतिक शिकवणीने, प्रेमाने लोकांची मने

वळविणे यावर बुध्दाचा भर होता. भगवान बुध्दाला आपले तत्वज्ञान प्रस्थापित करण्यासाठी रक्तपात किंवा हिंसा मान्य नव्हती. या उलट मार्क्सने आपला साम्यवाद प्रस्थापित करण्यासाठी जगातील कामगारांनो एक व्हा, हातामध्ये शस्त्र घ्या आणि भांडवलदारांचा शेवट करा असे हिंसात्मक आव्हान करतो. म्हणून मार्क्सचा विचार हा हिंसात्मक, हुकूमशाही, अनैतिक, घातकी स्वरूपाचा आहे तर, बुध्दाचा मार्ग मंद गतीचा, लांबपल्याचा, सुरक्षीत आणि जीवनाची हमी देणारा आहे.

**४) बुध्दाने लोकशाहीचा तर मार्क्सने हुकूमशाहीचा पुरस्कार केला आहे. :-**

तथागत भगवान बुध्दाने आपल्या तत्वज्ञानात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांचा अंगीकार करून लोकशाहीचा पुरस्कार केला. लोकांची मानसिकता बदलल्याशिवाय जगाचा उध्दार होणार नाही. म्हणून मानसिकता बदलण्यासाठी लोकशाही महत्त्वाची आहे. कार्ल मार्क्सने आपले साम्यवादी विचार रुजविण्यासाठी हुकूमशाहीच्या मार्गाचा पुरस्कार केला आहे. साम्यवादी व्यवस्थेच्या प्रस्थापनेसाठी संक्रमण काळात कामगारांच्या हुकूमशाहीचे समर्थन करतो. हुकूमशाही ही लोकांवर राज्य करण्यासाठी योग्य पध्दती नाही. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सवादापेक्षा भगवान बुध्दाचे लोकशाहीवादी, शांततावादी, अहिंसावादी, मानवतावादी, नीतिमान तत्वज्ञान जवळचे वाटते.

**निष्कर्ष :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द आणि कार्ल मार्क्स या विषयावर वैचारिक मंथन करतांना मानवी कल्याणाचे ध्येय बाळगणाऱ्या या प्रज्ञावंताच्या विचारातील साम्य-भेदाविषयी आपले विचार प्रगट केले. भगवान बुध्दाचा मार्ग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सर्वोत्तम, सुरक्षित, भक्कम वाटतो. म्हणुन ते व्यक्तीने बुध्दाच्या तत्वज्ञानावर विशेष भर द्यावा असे म्हणतात. साम्यवादी विचार हे हिंसेच्या व हुकूमशाहीच्या माध्यमातून प्रस्थापित केल्यामुळे रशियातील साम्यवादी व्यवस्थेच्या प्रस्तुततेबाबत डॉ. आंबेडकरांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. ते १९९० ला रशियाच्या विभाजनातून खरे ठरले साम्यवादी विचार हिंसात्मक, हुकूमशाही, अनैतिक असल्यामुळे दीर्घकालीन, चिरंतन नाहीत. या उलट बुध्द तत्वज्ञानाचा आधार अहिंसा, नैतिकता, लोकशाही, मानवतावाद, शांतता हे असल्यामुळे ते दीर्घकालीन आणि चिरंतन आहे. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात कार्ल मार्क्सच्या साम्यवादापेक्षा बुध्द तत्वज्ञान मानवी समाजाच्या उत्थानासाठी सर्वोत्तम पर्याय आहे.

**संदर्भ सूची :-**


१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे खंड - १०, संपादक प्रदिप गायकवाड, क्षितिज प्रकाशन, नागपूर.

२) सकाळ दिक्षा विशेषांक - २०१२, संपादक श्रीराम पवार.

३) धम्मचक्र प्रवर्तन महोत्सव विशेषांक ऑक्टोबर - २००६.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर, धनंजय किर.